जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७३६ दिनांक - ०७/१०/२०२३**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## दुकानदारास मारहाण करुन हप्ता मागणारे तसेच मध्यस्थी आलेल्या इसमास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या तसेच वाहनांची तोडफोड करणा-या आरोपीतांना केले जेरबंद

दि.०५/१०/२०२३ रोजी जांभुळवाडी रोड,आंबेगाव-खुर्द,पुणे येथील सुपर मार्केटचे चालक यांना आरोपीत भुषण भांडवलकर व जावेद शेख यांनी विनोद सोमवंशी याच्या सांगण्यावरुन मारहाण करण्याची व जीवे ठार मारण्याची धमकी देवुन,पैशांची मागणी करुन,पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरुन,भुषण व जावेद यांनी मार्केटचे चालक यास शिवीगाळ करत असताना,फिर्यादी हे मध्यस्थी म्हणुन आल्याने आकाश कांबळे, प्रविण गुंडे व अभिषेक भगुरे,विधीसंघर्षीत बालक व इतर ०८ ते १० इसमांनी संगनमताने घातक हत्यारांनिशी सज्ज होवुन, बेकायदेशीर जमाव जमवुन,फिर्यादी व साक्षीदार मार्केटचे चालक यांना शिवीगाळ करुन,विनोद सोमवंशीने फिर्यादी यांचे मुलास “तु आता गेलास,तुला खल्लासच करणार” असे म्हणुन त्याचे डोक्यावर वार करुन जखमी केले. तसेच इतरांनी फिर्यादी व त्यांचा पुतण्या वेदांत भंडारी याला व रोहीतचा मेव्हणा प्रविण अंकुश यास मारहाण करुन, इच्छा पुर्वक दुखापत करुन फिर्यादी यांच्या घराच्या दरवाजावर व खिडक्यांवर लाथा व दगडाने मारुन तसेच खाली पार्क केलेल्या गाडयांची तोडफोड करुन नुकसान केले आहे म्हणुन **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुरनं.६४५/२०२३,भादविक ३०७,३८५,३८७,३२४,४५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६(२),महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४ (२५),क्रिमीनल लॉ अमें.ॲक्ट क.३ व ७ सह बाल न्याय अधिनियम कलम ८३(२)** प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असताना **पोलीस अंमलदार, अभिजीत जाधव,विक्रम सावंत व हर्षल शिंदे** यांना नमुद गुन्हयातील आरोपी **१)आकाश गुलाबराव कांबळे,वय-२१,रा.दोरीवाली चाळ,शनिनगर,जांभुळवाडी रोड,आंबेगाव-खुर्द,पुणे २)प्रविण रामा गुंडे,वय-२३,रा.अंजलीनगर,सनं.६५,कात्रज,पुणे ३)अभिषेक देविदास भगुरे,वय-१८ वर्षे ०९ महीने,रा.अंजलीनगर लेन नं.३,शिंदे निवास,कात्रज,पुणे व तीन विधीसंघर्षीत बालक** हे कात्रज तलाव येथे थांबले असुन ते पळुन जाण्याच्या तयारीत आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी नमुद आरोपी व विधीसघर्षीत बालक यांचा शोध घेवुन **आ.क्र.१ ते ३ यांना दिनांक ०६/१०/२०२३ रोजी अटक करुन,तीन विधीसघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार,पुणे शहर, मा.पोलीस सह-आयुक्त,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०२,श्रीमती.स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक,धिरज गुप्ता, मोहन कळमकर, पोलीस अंमलदार,विक्रम सावंत, अभिजीत जाधव, हर्षल शिंदे, सचिन सरपाले, शैलेश साठे, चेतन गोरे, महेश बारावकर, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, अवधतु जमदाडे, निलेश खैरमोडे, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, राहुल तांबे, यांच्या पथकाने केली आहे.